# महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

९वा मजला, न्यु. एक्सलसियर
बिल्डींग, ए.के. नायक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दूरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९-५३
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com

क्र.आस्था-१९२१/प्र.क.०९/जाहिर सूचना/लघुलेखक/४५८/प्र.नि.प्रा./२०२१ दिनांक : २८ मे,२०२१

## जाहिर नोटीस

प्रवेश नियामक प्राधिकरण कार्यालयातील कामकाजाच्या अनुषंगाने "लघुलेखक" या पदाकरिता कंत्राटी पध्दतीने काम करण्यासाठी सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यामधून शासन विहित अटी-शर्तीनुसार विवक्षित कामासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पद/पदांची संख्या | पात्रता |
|---|---|---|
| १ | लघुलेखक संख्या (१) | अ) उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण<br>ब) मराठी व इंग्रजी व लघुलेखनाची गती १२० शब्द प्रती मिनीट, आणि मराठी व इंग्रजी टंकलेखनाची गती क्रमशः ३० व ४० शब्द प्रती मिनीट (तत्संबंधी शासकीय परीक्षा मंडळाचे प्रमाणपत्र आवश्यक)<br>क) संगणक साक्षरता आवश्यक. MSCIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.<br>ड) शासकीय कार्यालयात लघुलेखक म्हणून किमान ३ वर्षाचा काम केल्याचा अनुभव<br>इ) पत्रव्यवहारातील लिखाण व संभाषण निपुणता आवश्यक. |

**अटी व शर्ती:-**

१) उपरोक्त पद हे कंत्राटी पध्दतीने आहे सदर नियुक्ती सामान्य प्रशासन विभागाच्या संकिर्ण-२७१५/प्र.क्र१००/१३ दिनांक १७ डिसेंबर २०१६ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार करण्यात येणार आहे.
२) या पदावरील नियुक्ती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात व सुरुवातीला केवळ ११ महिन्याच्या कालावधीसाठी मर्यादित राहील.
३) उमेद्वाराचे कामकाज कोणत्यावेळी असमाधानकारक आढळल्यास सचिव यांच्या अनुमतिने एक महिन्याची पूर्व सूचना देऊन सेवा समाप्त करण्यात येईल.
४) सदर पदासाठी कंत्राटी पध्दतीने नियुक्ती असल्याकारणाने शासन नियमानुसार पारिश्रमिक देय राहिल.
५) आवश्यक अर्हता धारण असणाऱ्या इच्छुक उमेद्वाराने सदर पदाकरीता सोबतच्या नमुन्यात अर्ज सादर करावा.
६) पात्र उमेद्वाराने सदर पदाकरीता अर्ज दिनांक १०/०६/२०२१ पर्यंत maharashtra.ara@gmail.com या ई-मेल द्वारे पाठवावा. विहित दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही. तसेच या संदर्भातील कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही.
७) या संदर्भात अधिक माहितीसाठी ०२२-२२०१६१५७-५३ या दुरध्वनीवर संपर्क साधावा
८) प्राप्त झालेल्या अर्जाची आवश्यक ती पडताळणी करुन उमेद्वारास मुलाखत ऑनलाईन/ऑफलाईन पध्दतीने घेण्यात येईल तसेच उमेद्वारांना मुलाखतीकरीता कोणताही प्रवासभत्ता देय राहणार नाही.
९) नियुक्तीचे सर्व अधिकार प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांचे असतील.
१०) सोबत अर्जाचा नमुना

ठिकाण : मुंबई

दिनांक : २८/०५/२०२१

सचिव, भाप्रसे
प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई.

## अर्जाचा नमुना

### सेवानिवृत्त राज्य शासकीय कार्यरत अधिकारी यांची करार पद्धतीने नियुक्ती करण्याकरिता अर्ज

| |
|---|
| उमेदवाराने अलीकडील काळातील स्वतःचे छायाचित्र येथे चिकटवावे |

| | | | |
|---|---|---|---|
| १) | अर्जदाराचे संपूर्ण नाव | : | ______________________ |
| २) | अर्जदाराचा पत्ता | : | ______________________<br>______________________<br>______________________ |
| ३) | भ्रमणध्वनी क्रमांक | : | ______________________ |
| ४) | ई-मेल | : | ______________________ |
| ५) | जन्म दिनांक व वय | : | ______________________ |
| ६) | विभागास आवश्यक अहर्ता अर्जदाराकडे आहे काय ? | : | होय /नाही |
| ७) | अनुभव | : | ______________________<br>______________________ |

महाराष्ट्र विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियम) अध्यादेश, २०१५ च्या स्थापन करण्यात आलेल्या प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामध्ये कंत्राटी पद्धतीने नियुक्ती बाबतची जाहिरात/सुचना मी काळजीपूर्वक वाचली असून सदर जाहिरातीतील /सुचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण :

दिनांक

अर्जदाराची स्वाक्षरी

(नोट:-वर नमूद सर्व माहिती पूर्ण भरावी, सदर माहिती पुढील कार्यवाही साठी अनिवार्य आहे.)